Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

UGC Approved Monthly Journal

VOL-IV ISSUE-VIII Aug. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# भारतीय स्वातंत्र्यलढयात क्रांतीसिंह नाना पाटील यांचे योगदान

**डॉ.ओ.व्ही.लिगाडे**
इतिहास विभाग प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

महाराष्ट्रात प्रामुख्याने सांगली सातारा भागात स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारे,प्रतिसरकार हा समांतर शासनाचा एकमेव प्रयोग राबविणारे लढवय्ये राजकारणी म्हणून क्रांतीसिंह नाना पाटील यांच्याकडे पाहिले जाते.

क्रांतीसिंह नाना पाटील यांचा जन्म ३ ऑगष्ट १९०० रोजी सांगली जिल्हयातील बहे-बोरगाव येथे झाला.त्यांचे मुळ गाव सांगली जिल्हयातील येडेमच्छिंद्र हे आहे.त्यांचे वडील रामचंद्र तर आई गोजराबाई. नानाला लहानपणापासून दणकट शरीरयष्टीचे वरदान लाभले होते.नानांनी मराठी शाळेत सातवी पर्यंतचे शिक्षण प्रतिकूल परिस्थितीत कसे बसे पूर्ण केले.त्यानंतर ते त्याकाळची मुलकी परीक्षा उत्तीर्ण झाले. तलाठयाची नौकरी करू लागले.परंतु राजकारण आणि समाजकारणाची ओढ असलेल्या नानाचे त्यामध्ये मन रमेनासे झाले. लवकरच राजीनामा देऊन नौकरीतून बाहेर पडले.

नानावर महात्मा फूले यांच्या सत्यशोधकविचारसरणीचा प्रभाव होता.त्यांनी सत्यशोधक समाजाच्या तत्वाचा प्रचार केला.समाजातील देवभोळया समजूती, जातीभेद, हूंडापध्दती, अनिष्ठ रूढी परंपरा, बालविवाह, विधवा जीवन यावर त्यांनी कठोर हल्ले केले. नानांचे दोन्ही मार्गांनी कार्य चालू होते. १) स्वातंत्र्यलढा २) बहूजन समाजाचा विकास. इ.स. १९२६ नंतर नाना स्वातंत्र्यचळवळीकडे आकृष्ट झाले.नोकरीचा राजीनामा देऊन काँग्रेसमध्ये दाखल होऊन ब्रिटीश सत्तेविरूध्द संघर्ष करण्याचा निर्धार त्यांनी केला.१९३० मध्ये महात्मा गांधीनी चालविलेला सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी झाले.त्यांनी आपल्या ओजस्वी वक्तृत्वाने ग्रामीण जनतेला गुलामगीरीची जाणीव करून देऊन, जनतेला धाडसी बनविण्याचा प्रयत्न केला.ग्रामीण भागातील, बहूजन समाजातील लोकांचा स्वाभीमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून घेणे हे क्रांतीसिंह नानाचे प्रमुख योगदान होय.

इ.स. १९४० मध्ये महात्मा गांधी यांनी चालविलेल्या वैयक्तीक सत्याग्रहात नानानी दोनवेळा सहभाग घेतला.दोन्ही वेळा त्यांनी तुरूंगवास भोगला.१९४२ च्या चलेजाव चळवळीतील त्यांचे कार्य अविस्मरणीय स्वरूपाचे आहे.'आपुला आपण करू कारभार' हे नानाचे सूत्र होते त्यानूसार त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात सातारा जिल्हयात प्रतिसरकार स्थापन केले.नाना पाटील हे जनसमुदायाच्या पातळीवर प्रतिसरकारचे प्रमुख मानले जात होते.ब्रिटीशांची राज्यव्यवस्था नाकारून त्यांनी सातारा जिल्हयात स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या प्रतिसरकारच्या माध्यमातून लोकन्यायालये, कर गोळा करणे,अस्पृश्यतानिवारण,साक्षरता प्रसार,ग्रामसफाई, दारूबंदी,हुंडाबंदी,स्वदेशी पुरस्कार,अन्नधान्य पुरवठा,बाजारव्यवस्था,कमी खर्चात लग्न लाऊन देणे इ. लोकोपयोगी कामे केली जात असत.

नाना पाटील यांच्या प्रतिसरकारमध्ये विविध दले होती. त्यापैकी तुफान सेनादलाचे फिल्ड मार्शल जी.डी. लाड होते.या दलाची कुंडल येथे युध्दशाळा होती.तेथे पाच हजारच्या वर जवानांच्या दोनशे शाखा

होत्या.तलवारी, जांबिया, पिस्तूल, बॉम्बगोळे वापरण्याचे प्रशिक्षण त्यांना दिलेले होते.ब्रिटिशांच्या रेल्वे, पोष्ट, तारायंत्र इ. सेवावर हल्ले करून ते नेस्तनाबूत करण्याचे तंत्रही नानांनी यशस्वीपणे राबविले.१९४३-१९४६ यादरम्यान सांगली व सातारा जिल्हयात सुमारे १५०० गावात प्रतिसरकारे स्थापन करण्यात आली होती.

नाना पाटील यांच्या प्रतिसरकारला लोक पत्रीसरकारही म्हणत.नाना पाटील ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या तळपायाला पत्रा ठोकतात अशा अफवा होत्या.तसेच जे गावगुंड अथवा गावटगे आहेत त्यांच्या पायाला शिक्षा म्हणून पत्रा ठोकून त्यांच्यावर बसविलेल्या दहशतीमुळे या सरकारची पत्री सरकार अशी ओळख झाली असे म्हणतात.इ.स. १९२० ते १९४२ या काळात नांनानी ८-१० वेळा तुरूंगवास भोगला.१९४२ ते १९४६ या सुमारे ४४ महिन्याच्या काळात ते भूमिगतच होते.ब्रिटीशांनी त्यांना पकडण्यासाठी बक्षिस जाहिर केले, जंगजंग पछाडले, परंतु नाना ब्रिटीशांना सापडले नाहीत.ते भुमिगत असताना ब्रिटीशांनी त्यांच्या घरावर जप्ती आणली. त्यांची जमीनही सरकारजमा करून टाकली.याचदरम्यान त्यांच्या आईचे निधन झाले.नानांनी आपला जीव धोक्यात घालून धावपळीत आईवर अंतिम संस्कार केले.भारताला स्वातंत्र्य मिळणार हे निश्चित झाल्यावरच ते १९४६ मध्ये कऱ्हाड तालुक्यात प्रकट झाले.

ब्रिटीशांच्या विरूध्द प्रति सरकारच्या रूपाने प्रतिशासन यंत्रणा, निर्माण करून स्वतंत्र कारभार करण्याचे जे अपूर्व धाडस त्यांनी दाखविले त्यामुळेच त्यांना क्रांतीसिंह म्हणून ओळखले जाऊ लागले.त्यांच्या दहशतीमुळे इंग्रज अधिकारीही त्यांच्या प्रदेशात जाण्यास घाबरत असत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नानांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग घेतला. त्यांनी शेतकरी कामगारपक्ष आणि भारतीय कम्यूनिस्ट पक्ष या राजकीय पक्षाच्या माध्यमातून कार्य केले.१९५७ मध्ये उत्तर सातारा मतदार संघातून तर १९६७ मध्ये बीड मतदार संघातून लोकसभेवर ते निवडून गेले.संसदेत मराठीतून भाषण करणारे ते पहिले खासदार होते.

नाना पाटील स्वतः सामान्य शेतकरी कुटूंबातील असल्याने शेतकऱ्यांच्या दुःख व दारिद्रयाची त्यांना जाणीव होती, खेडयापाडयातील बहूजन समाजाच्या दुःखाची व्यथा त्यांना माहित होती.म्हणूनच नानांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेतकऱ्यांना संघटीत करून अनेक लढे उभारले.शेतकरी वर्गासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन १९५५ मध्ये त्यांची आखिल भारतीय किसान सभेच्या अध्यक्षपदी निवड झाली होती.

कोल्हापूर संस्थानातील प्रजा परिषदेच्या चळवळीस्तव मराठवाड्यातील रझाकारविरोधी चळवळीस त्यांनी मराठी भाषिक प्रदेशाचे महाराष्ट्रात विलीनीकरण व्हावे म्हणून उभारण्यात आलेल्या लढयामध्ये क्रांतीसिंह नानाची भूमिका महत्वाची ठरते.६ डिसें. १९७६ रोजी वाळवा येथे त्यांचे निधन झाले.माझा मृत्यू झाल्यानंतर माझे दहन वाळव्यामध्येच करण्यात यावे अशी त्यांची इच्छा होती.त्यानुसार त्यांच्यावर वाळव्यामध्येच दहन संस्कार करण्यात आले.

**निष्कर्ष :-**

- नाना पाटील म्हणजे शेतकऱ्यांशी सुसंवाद साधणारे व्यक्तिमत्व होय.
- नाना पाटील म्हणजे दीन-दुबळयांचा आधार होय.
- नाना पाटील म्हणजे, प्रतिसरकार अथवा पत्रीसरकारचे जनक होत.
- नाना पाटील म्हणजे एक समाजसुधारक आहेत.
- नाना पाटील म्हणजे एक जाणता राजकारणी सुध्दा आहेत.

- सातवी शिकलेला एखादा माणूस ध्येय, जिद्द आणि महत्वाकांक्षा असेल तर किती महान होऊ शकतो त्याचे उदाहरण म्हणजे क्रांतीसिंह नाना पाटील.

**संदर्भ :-**

१) पाटील दिनकर, क्रांतीसिंह नाना पाटील आणि शेतकरी चळवळ,किर्ती प्रकाशन
२) पाटील विलास, क्रांतीसिंह नाना पाटील, क्रांतीवैभव प्रकाशन.
३) मढीकर दिलीप, क्रांतीसिंह नाना पाटील : चरित्र आणि कार्य, ललीतराज प्रकाशन
४) डॉ. गव्हाणे किशोर कुमार, आधूनिक महाराष्ट्राचा इतिहास, अरूणा प्रकाशन.
५) स्वामी व्ही.एन., महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन.
६) Mr.m.wikipedia.org/wiki/Nana-patil

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com